# Month :- August 2023

## Rayla Project

## Title :- Fixation of targets for wonderful Achivement







**पुढारी**



ध्येयनिश्चिती व्याख्यानमालेत बोलताना मंजुताई फडके.

### स्पर्धेत टिकायचं असेल, तर आत्मविश्वास वाढवा : फडके

**नारायणगाव : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धेत टिकून राहायचं असेल, तर आपल्या आत्मविश्वासात वाढ करा व मोठी ध्येय ठेवा. ती पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहा, असा संदेश रोटरी क्लबच्या जिल्हा प्रांतपाल डिस्ट्रिक्ट मंजुताई फडके यांनी दिला.

ग्रामोन्नती मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित रोटरी क्लब नारायणगाव हायवे यांच्या संयुक्त विद्यमाने दोनदिवसीय ध्येयनिश्चिती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्या वेळेस फडके बोलत होते. विम्लेश गांधी, सचिन घोडेकर, रवींद्र वाजगे, विजयकुमार आहेर, पंजाब कथे, श्यामराव थोरात, प्राचार्य डॉ. ए. बी. कुलकर्णी, डॉ. एस. डी. टाकळकर, उपप्राचार्य जी. बी. होले, इतिहास विभागप्रमुख डॉ. उत्तम पठारे, डॉ. एस. एम. फुलसुंदर आदी या वेळी उपस्थित होते.

फडके म्हणाले, ध्येय निश्चित करा, स्वतःचे गुण ओळखा, स्वतः मध्ये संभाषण कला विकसित करा. आपल्यामध्ये असणाऱ्या कमतरता शोधा. स्वतःमध्ये नवनवीन गोष्टी विकसित करून स्वतःला अपडेट ठेवा, असेही त्यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बिझनेस लॉ सदस्य डॉ. जी. एम. डुंबरे यांनी 'कॉलेज जर्नी' या विषयावर मनोगत व्यक्त केले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. टाकळकर यांनी 'मिशन गोल सेटिंग' या विषयावर मार्गदर्शन केले. वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. विनोद पाटे यांना महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (सेट), तर प्रा. डॉ. वैशाली मोढवे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी मिळाल्याबद्दल गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. एस. मोढवे यांनी केले, तर डॉ. मधुरा काळभोर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Jul 30, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in